मंगळवार दि.२६ नोव्हेंबर २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : ८०

# दैनिक लोकनेता
बीड

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४


# उद्धव ठाकरेंची खेळी : नव्या २० आमदारांकडून शपथपत्र लिहून घेणार

## पक्षफुटीचा संभाव्य धोका टाळण्यासाठी झाले दक्ष



लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

उद्धव ठाकरे आपल्या २० नव्या आमदारांकडून शपथपत्र लिहून घेणार असल्याचे समजते. एकनाथ शिंदेंनी बंड केले. पक्ष फोडला. ४० आमदार सोबत घेऊन भाजपच्या वळचणीला गेले. हा संभाव्य धोका पुन्हा होऊ नये यासाठी उद्धव ठाकरे आत्ताच दक्ष झाल्याचे समजते.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नवनिर्वाचित आमदारांची आज उद्धव ठाकरेंसोबत मातोश्रीवर बैठक पार पडली. या बैठकीत उद्धव ठाकरे यांनी नवनियुक्त आमदारांना मार्गदर्शन केले. विधानसभेत जरी समोर फडणवीस असले, तरी तुम्ही २० आहात. त्यांना पुरून उरा, असा कानमंत्र उद्धव ठाकरे यांनी आमदारांना दिला. या बैठकीत पक्षाचा प्रतोद, गटनेते आणि सभागृह नेते यांची निवड करण्यात आली.

विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला दारुण पराभवाचा सामना करावा लागला. महाविकास आघाडीतील शिवसेना ठाकरे गटाचे सर्वाधिक २० आमदार निवडून आले आहेत. या नवनिर्वाचित २० आमदारांची उद्धव ठाकरे यांनी आज बैठक घेतली. यावेळी उद्धव ठाकरे यांनी आमदारांचे मनोधैर्य वाढवण्याचा प्रयत्न केला. शिवसेना स्थापनेच्या काळात वामनराव माहडिक हे शिवसेनेचे एकमेव आमदार विधानसभेत होते. त्यावेळी त्यांनी एकटे असूनही विधानसभा गाजवली होती. पण तुम्ही आता २० आहात, त्यामुळे आपल्या मुद्द्यांनी आणि भूमिकेने विधानसभा गाजवा, असे उद्धव ठाकरे आमदारांना म्हणाले.दरम्यान, शिंदे गटाचे आमदार भरत गोगावले यांनी ठाकरे गटातील काही आमदार आपल्या संपर्कात असल्याचा दावा केला. या सर्व पार्श्वभूमीवर तसेच पक्षफुटीचा मोठा अनुभव घेतल्यानंतर ठाकरे गटाकडून विशेष खबरदारी घेतली जात असल्याचे पाहायला मिळत आहे. उद्धव ठाकरे विजयी आमदारांकडून शपथपत्र लिहून घेतल्याची माहिती आहे. दगाफटका होऊ नये तसेच पक्षफुटीचा धोका लक्षात घेता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून नवनिर्वाचित आमदारांकडून हे शपथपत्र लिहून घेतले. पक्षामध्ये पक्षप्रमुखांचा निर्णय हा अंतिम राहणार, पक्षाने घेतलेल्या निर्णयाशी सर्व आमदार बांधिल असतील, अशा आशयाचे हे शपथपत्र सर्व नवनिर्वाचित आमदारांकडून लिहून घेतल्याची माहिती आहे.या बैठकीत पक्षाचा प्रतोद, गटनेते आणि सभागृह नेते निवडण्यात आले. उद्धव ठाकरे यांनी भास्कर जाधव यांच्यावर मोठी जबाबदारी दिली आहे. भास्कर जाधव यांची उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या गटनेते पदी निवड करण्यात आली आहे. सुनिल प्रभू यांची पुन्हा एकदा प्रतोदपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर आदित्य ठाकरे यांची विधिमंडळ पक्ष नेतेपदी निवड करण्यात आली. पक्षप्रमुखांनी दिलेला आदेश विनम्रपणे स्वीकारावा लागतो. अन्यथा आदित्य ठाकरे यांची विधानसभा गटनेते पदी निवड व्हावी, असे माझे मत होते, अशी प्रतिक्रिया भास्कर जाधव यांनी दिली.

# महामंडळाच्या गाड्या वेळेवर नसल्या मुळे विद्यार्थी व नागरिकांची गैरसोय

## उस्माननगर येथून आठ वाजता गाडी नांदेडला जाण्यासाठी चालू करावी

लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । बाजीराव गायकवाड

नांदेड एसटी महामंडळाच्या गाड्या वेळेवर उस्माननगर परिसरातील ग्रामीण भागात येत नसल्याने विद्यार्थी व नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे.जर उस्माननगर येथून आठ वाजता वेळेवर गाडी नांदेडला जाण्यासाठी केली तर विद्यार्थ्यांना शाळेला व प्रवाशांना जिल्ह्याच्या ठिकाणी वेळेवर पोहोचून कामे करण्यासाठी सोयीचे ठरणार आहे

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या गाड्या जिल्हा पातळीवरून खेडो पाडी वाडी तांड्यावर जातात. जेणेकरून विद्यार्थी व नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून महामंडळ काळजी घेत असते. शासन जनतेच्या सेवेसाठी गाडी गावा गावात पोहचण्यासाठी परिपूर्ण जबाबदारी आहे . उस्माननगर, शिराढोण , भुत्याचीवाडी , लाठ खु. , कलंबर (खुर्द ), कलंबर बु,तेलंगवाडी , लोंढे सांगवी , जोशी सांगवी , टेळकी ,



वडगाव , तांडा , बाभुळगाव , अशा गावातील विद्यार्थी , प्रवासी दररोज जिल्ह्याच्या ठिकाणी ये ..जा.. असते. जिल्ह्यातील नामवंत कॉलेज , शाळेत , विद्यार्थी ज्ञानदान घेण्यासाठी वेळेवर जाण्यासाठी गाडीची रोडवर बस स्थानकावर ताटकळत वाट पाहत उभे राहावे लागते. नांदेड एसटी महामंडळाची एसटी सकाळी नांदेड हून येणारी गाडी ही उस्माननगर शिराढोण येथून आठ वाजताच्या अगोदरच जात असल्यामुळे विद्यार्थ्यांना व नागरिकांना नऊ वाजताच्या गाडीची वाट पाहत त्या गाडीला गर्दी झाली तरी पैसे देऊन प्रवाशांना उभे राहून दोन पायांवर प्रवास करावा लागतो आहे.

नांदेड हुन परत गावाकडे निघताना एसटी बस स्थानकात गाडीची चौकशी साठी हेलपाटे मारावे लागतात. साडे चार वाजता गाडी असणे आवश्यक आहे. शाळा सुटल्यानंतर विद्यार्थ्यांना घराकडे जाण्यासाठी मोठी परेशानी करावी लागते. विद्यार्थ्यांकडे शाळेसाठी म्हणून एसटी महामंडळाच्या वतीने पास असल्याने विद्यार्थी अगाऊ पैसे घेऊन जात नसल्याने विद्यार्थ्यांना गाडीसाठी ताटकळत गाडीची प्रतिक्षा पहात बसावे लागते.

जर गाड्या ची ये.जा वेळेवर सोडल्यास विद्यार्थी व नागरिकांची गैरसोय होणार नाही याची महामंडळाच्या वरिष्ठांनी लक्ष द्यावे अशी मागणी विद्यार्थी व नागरिकांनी केली आहे.

# शिंदेंसोबत गुवाहाटीला गेलेले ५ आमदार पराभूत

लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना शिंदे पक्षाचे गुवाहाटीला गेलेले पाच आमदार पराभूत झाले आहेत. दरम्यान, विधानसभा निवडणुकीत शिंदे यांच्यासोबत गुवाहाटीला गेलेले सर्व निवडून आणले नाही, तर राजकारणातून निवृत्ती घेऊ असे म्हणले होते. पराभूत आमदारांमध्ये सदा सरवणकर, यामिनी जाधव, शहाजीबापू पाटील, संजय रायमूलकर आणि ज्ञानराच चौगुले यांचा समावेश आहे.माहीममध्ये सदा सरवणकर यांचा तिरंगी लढतीत पराभव झाला. शहाजीबापू पाटील यांना सांगोल्यात शेतकरी कामगार पक्षाकडून पराभव स्वीकारावा लागला. भायखळ्यातून यामिनी जाधव पराभूत झाल्या. बुलढाण्यातून संजय रायमूलकर यांचा पराभव झाला. उमरग्यामध्ये ज्ञानराज



चौगुले यांचा पराभव झाला आहे. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेले आव्हान खोटे ठरले असल्याचे दिसत आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जून २०२२ मध्ये शिवसेनेत बंडखोरी केली होती. ते शिवसेना आणि अपक्ष असे ५० आमदार सोबत घेऊन बाहेर पडले होते. त्यामुळे उद्धव ठाकरेंचे सरकार पडले होते. एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यानंतर भाजपसोबत सत्ता स्थापन केली होती. उद्धव ठाकरे यांच्याकडील धनुष्यबाण हे चिन्हही निवडणूक आयोगाने त्यांना दिले होते. विधानसभा निवडणुकीत बंडखोरांमधील एकही आमदार निवडून येणार नाही, असा दावा शिवसेनेच्या नेत्यांकडून केला जात होता. पण हा दावा आता फोल होताना दिसत आहे.त्यावेळी झालेल्या विधानसभेच्या अधिवेशनात मुख्यमंत्री झाल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी आपले पहिले भाषण केले होते. आमचा ५० मधला एकही आमदार आम्ही पडू देणार नाही. तसेच भाजपचेही ११५ आमदार मिळून आम्ही २०० चा आकडा पार करू. हा सभागृहात शब्द आहे आणि तसे नाही केले, तर गावाला शेती करायला जाईन, असे एकनाथ शिंदे म्हणाले होते. आता शिंदेंच्या शिवसेनेने ५५ जागांवर आघाडी घेत आपला स्ट्राईक रेट वाढविला आहे. तसेच महायुतीचा आकडा २२० पेक्षा अधिक होताना दिसत आहे.

# निवृत्तीराव गोविंदराव वाघमारे भेंडेगावकर यांचे निधन



लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । प्रतिनिधी

सिडको येथील रहिवासी व माजी पोस्ट मास्तर होते मनमिळावू स्वभावाचे निवृत्तीराव गोविंदराव वाघमारे भंडेगावकर वय ७५ वर्षे यांचे दि.२५/११/२०२४ रोजी सकाळी त्यांच्या राहते घरी त्यांना देवाज्ञा झाली आहे त्यांचे प्रस्चात पत्नी व तीन मुले व एक मुलगी नातू पंतू असा परिवार असून त्यांच्या पार्थिवावर मंगळवार दि.२६/११/२०२४ रोजी सकाळ १० वा त्यांची अंतयात्रा निघणार असून सिडको येथील समशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## चारोळी

छंद देई आनंद
हरवून जावे कधीतरी
फिरवत रहावेत कुंचले अन
भावरंग उमटतील अंतरी.

रंजना सानप
मायणी (सातारा)

## निवासी वसतिगृहाचा वाली कोण

# विद्यार्थ्यांच्या पालकाचा कोणीच उचलत नाही फोन






लोकनेता न्यूज नेटवर्क

नायगाव । माधव बैलकवाड

मागासवर्गीय नवबौद्ध निवासी वस्तीगृह नायगाव येथील मुलांची शाळा दिनांक १८ नोव्हेंबर रोजी भरली असून खानावळ चालक अजूनही वस्तीगृहात आला नसल्याने बाहेरगावची गोरगरिबांची शिकणारी मुले हे आपली शाळा भरली म्हणून आले असता खानावळ चालक अजूनही आला नाही असे सांगून मुख्याध्यापक यांनी विद्यार्थ्यांना घरी पाठवले, याबाबत संबंधित अधिकारी यांना विद्यार्थ्यांच्या पालकानी फोन केले असता कोणीही फोन उचलत नाही तेव्हा विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे काय हा प्रश्न पालका पुढे निर्माण झाला आहे.

शाळा भरून आठ दिवस उलटून गेले तरीही नायगाव येथील मागासवर्गीय नवबौद्ध निवासी वस्तीगृहाचा खानावळ चालक अजून तरी वस्तीगृहात आलेला नाही मुख्याध्यापक आणि खानावळ चालक यांच्यात नेमके काय गुपित लपले आहे की जेणेकरून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसान जाणून-बुजून ते करीत आहेत आणि आपली शाळा भरली म्हणून बाहेर गावातील मुले यात करण जाधव बिलोली इयत्ता आठवी, सुशील एडके कोलंबी इयत्ता सातवी, परमेश्वर अलमुलवाड मुखेड इयत्ता सातवी, आणि श्रीकांत कोकुलवार हदगाव इयत्ता सातवी हे विद्यार्थी आज दिनांक २५ नोव्हेंबर रोजी सदर वस्तीगृहात आले असता अजूनही खानावळ चालक आला नाही, आपणास भोजनाची व्यवस्था नाही म्हणून त्यांना परत मुख्याध्यापक एन व्ही हत्ते यांनी पाठवले याबाबत कार्यालयीन अधीक्षक एस.डी .सुरेवाड यांच्याशी विद्यार्थ्यांचे वडील संदीप त्र्यंबक एडके यांनी संपर्क केला असता त्यांनी देखील आपण देवदर्शनासाठी बाहेरगावी गेलो असे सांगून मोकळे झाले तर संबंधित मुख्याध्यापक एन व्ही हत्ते यांनी देखील उडवाउडवीची उत्तरे देऊन फोन कट केला आहे.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असताना खानावळ चालक मुख्याध्यापक आणि कार्यालयीन अधीक्षक यांच्या कार्यप्रणाली बाबत वरिष्ठांना कळवावे या उद्देशाने समाज कल्याण अधिकारी राजेश मंगनाळे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी देखील फोन रिसीव केला नाही.

समान शाळा समान शिक्षण हे तर गोरगरिब विद्यार्थ्यांच्या वाट्याला येईल असे वाटत नाही, परंतु जिथे गरीब विद्यार्थ्यांसाठी शिक्षणासाठी वस्तीगृह असताना तिथे देखील अशा अनेक समस्या उद्भवतात.

# धनंजय मुंडे यांच्या विजया मध्ये आंबेडकरी समाजाचे मोठे योगदान-माधवराव ताटे

लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड । विजय रोडे

महाराष्ट्र राज्यात नुकत्याच विधानसभेच्या निवडणुका पारपडल्या यामध्ये धनंजय मुंडे यांचा विरोधी उमेदवाराच्या पेक्षा १४०००० हजार मताधिक्य मिळवून परळी विधानसभा मतदार संघ व राज्यात नवाविक्रम नोंदवला आहे या विजयामध्ये आंबेडकरी समाजाचे मोठे योगदान असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठनेते माधवराव ताटे यांनी यावेळी सांगितले.



परळी विधान सभेच्या निवडणुकीमध्ये मतदारसंघातील आंबेडकरी समाज पुर्ण ताकदीने धनंजय मुंडे साहेबांच्या पाठिशी उभा राहिल्यामुळे १४०००० मताधिक्य मिळवले आहे. या विजया मध्ये आंबेडकरी समाजाचे मोठे योगदान असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठनेते माधवराव ताटे यांनी सांगत पुढे बोलताना म्हणाले की, विक्रमादित्य नवनिर्वाचित आमदार धनंजय मुंडे साहेबांकडे समाजाच्या भरपूर अपेक्षा निर्माण झाल्या आहे. नक्कीच येणाऱ्या काळा मध्ये मुंडे साहेब पूर्ण करतील असा विश्वास व्यक्त केला असून होऊ घातलेल्या सरकारमध्ये मोठे मंत्रीपद मिळणार आहे. समाजाच्या उन्नती प्रगती साठी समाजाच्या त्यांच्या कडे ज्या अपेक्षा आहेत त्या पूर्ण करतील असा विश्वास माधवराव ताटे यांनी व्यक्त केला.

# शहीद कै.सुधाकर शंकर राठोड यांना वीरमरण

लोकनेता न्यूज नेटवर्क

मुखेड । शिवकुमार बिरादार

मुखेड,तालुक्यातील हिरानगर तांडा येथील सुपुत्र हवलदार सुधाकर शंकर राठोड हे शहीद झाले. लेह या ठिकाणी सिंयाचन ग्लेशरमध्ये मायनस -२२ डिग्री मध्ये बर्फाळ भागात पोस्टावर आपली ड्युटी बजावत असताना अतिथंड व बर्फाच्या रिएक्शन मुळे त्यांना वीरमरण आले. त्यांच्या पश्चात आई धोंड्याबाई राठोड वडील शंकर राठोड, पत्नी आशाबाई सुधाकर राठोड, २००९ ला लग्न झाले होते. मुलगा ओम वय वर्ष ८ मुलगी साक्षी वय वर्ष ६ तसेच भाऊ मधुकर राठोड बहीण कमलबाई चव्हाण यांचे लग्न झाले. वडील शंकर राठोड यांचे दोन वर्षाखाली निधन झाले होते. शहीद सुधाकर राठोड हे २००६ ला भारतीय सैन्य दलात दाखल झाले होते. त्यांची सेवा १९ वर्ष चार महिने झाली होती. पुढच्याच वर्षी त्यांना स्वंय इच्छुक सेवानिवृत्ति घ्यायची



होती. सेवानिवृत्तीच्या काही महिन्यापूर्वीच त्यावर काळाने घातला. आणि आज दिनांक २५ -११- २०२४ रोज सोमवार पहाटेच्या सुमारास आपली ड्युटी बजावत असताना अखेरचा श्वास घेतला. शहीद जवानांचा पार्थिव चंदीगड वरून हैदराबादला विमानाने उद्या सकाळी येणार आहे. आणि हैदराबाद वरून बाय रोड मुखेड येथे रवाना होणार आहे. अंत्यविधी दिनांक २७ ११ २०२४ रोज बुधवार सकाळी १० : ०० वाजता. जन्मगाव हिरानगर तांडा ता मुखेड येथे होणार आहे.

## संपादकीय..

# जागरूकता पाळा पैसे सांभाळा!




आपल्याला सध्याच्या काळात बरेचदा ऑनलाईन आर्थिक व्यवहार करावे लागतात. अनेक मेसेज, मेल आपल्याला येत असतात. त्यात काही फसवणूक करणारे असू शकतात. काल असाच एक ईमेल आला आणि त्याला ई-ऋऊ जोडलेली होती. अगदी खरा वाटणारा हा मेल होता. सावधगिरी म्हणून मेल ओपन न करता बँकेत चौकशी केली तेव्हा त्यांनी सांगितले की, असा कुठलाही मेल आम्ही पाठवलेला नाही. त्याच आनुषंगाने सांगावेसे वाटते की, कधी बेसावधपणे आपण असा फसवा मेसेज किंवा मेल बघितला, ओपन केला आणि अकाउंटमधून क्षणार्धात पैसे गेले तरी घाबरून न जाता लगेच १९३० ह्या नंबरवर फोन केला पाहिजे. तसेच ु.लूलशीलीळाश.सीं.ळप ह्या संकेत स्थळावर जाऊन तक्रार नोंदवावी.

फसवणूक बहुतेक वेळा अनोळखी, बिन चेहऱ्याच्या माणसांकडून किंवा काही वेळा एखाद्या ओळखीच्या, भरवशाच्या माणसाकडूनही होऊ शकते. श्री. व सौ. गंगोपाध्याय हे हैदराबाद येथे राहणारे ज्येष्ठ नागरिक आहेत. त्यांचे स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये सेव्हिंग आणि मुदत ठेव खाते होते. ९ ऑगस्ट २०१७ रोजी सौ. गंगोपाध्याय ह्यांनी १५ लाखांच्या २ आणि १० लाखांची १ अशा ४० लाखांच्या मुदत ठेवी ड्इख हैदराबाद शाखेत उघडल्या. श्री. गंगोपाध्याय ह्यांनी जवळ जवळ २ वर्षांनी, ४ एप्रिल २०१९ ला बँकेकडून नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९ चे अकाउंट स्टेटमेंट घेतले. ते वाचून त्यांना जबरदस्त धक्का बसला कारण अकाउंटमध्ये २८ लाखांऐवजी ३ लाख रुपयेच शिल्लक होते. त्यांना असेही आढळले की हे पैसे इंटरनेट बँकिंगमार्फत वळवले गेले होते. पण आश्चर्य म्हणजे त्यांनी इंटरनेट सेवा मागितली नव्हती. त्यांनी तखएथ ONLY सेवा मागितली होती. मग हे कसे घडले असेल बरे ह्या विचारात ते पडले. नंतर लक्षात आले की, एका ओळखीच्या, विश्वासातल्या माणसाकडून त्यांची मोठी फसवणूक झाली होती. त्यांनी ५ दिवसांनी पोलिसात तक्रार केली आणि लगेच बँकेच्या शाखेत तक्रार केली. त्यांनी बँकेच्या असे निदर्शनात आणून दिले की ४० लाखांच्या ठेवी मुदत संपण्या अगोदर बंद करून सेव्हिंग खात्यात पैसे जमा केले गेले आणि या पैशातील फक्त ३ लाख रुपये शिल्लक राहिले आहेत. ह्यावर बँकेने असे सांगितले की, सौ. गंगोपाध्याय ह्यांच्या अकाऊंटची इंटरनेट बँकिंग सेवा अनधितकृतपणे वापरली गेली असण्याची शक्यता दिसते. इथे असे नमूद करावेसे वाटते की त्यांचे बँकेचे सर्व व्यवहार त्यांचा ड्रायव्हर करीत असे.

बँकेने काहीच मदत न केल्याने गंगोपाध्याय ह्यांनी राज्य आयोगाकडे तक्रार केली. नुकसानभरपाई म्हणून ६३ लाख, वार्षिक व्याज, मानसिक त्रासाबद्दल २५ लाख आणि कोर्टकचेरीच्या खर्चाबद्दल २० हजार रुपये मागितले. तक्रारीत त्यांनी ह्या गोष्टीवर भर दिला की खातेदार ज्येष्ठ नागरिक आहेत आणि TECH SAVVY नाहीत म्हणून सावधगिरीचा उपाय म्हणून त्यांनी view only पर्याय निवडला होता. बँकेने निष्काळजीपणे खातेदाराकडे चौकशी न करता ींळशु`पश्रू पर्याय बदलून पैशाचे व्यवहार करण्याची परवानगी दिली. त्यामुळे ह्या नुकसानाला बँकच जबाबदार आहे. ह्यावर बँकेने सांगितले की खातेदाराने आपला मोबाईल, PIN नंबर, पासवर्ड आणि इतर माहिती ड्रायव्हरसारख्या जवळच्या माणसाला देणे हे चुकीचेच आहे. बँकेने पुढे असेही म्हटले की, हे सर्व ३७ वेळा केले गेलेले व्यवहार एकतर खातेदाराच्या संमतीने झालेले आहेत किंवा खातेदाराच्या निष्काळजीपणामुळे झालेले आहेत.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून राज्य आयोगाने गंगोपाध्याय ह्यांच्या बाजूने निर्णय दिला. आयोगाने स्टेट बँकेला असेही सांगितले की, ते ६३ लाखांच्या वसुलीसाठी ते फौजदारी न्यायालयात दावा दाखल करू शकतात. ह्यावर स्टेट बँकेने राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे वरील निर्णयाविरुद्ध अपील केले. त्यांनी असा युक्तिवाद केला की फसवणुकीच्या तक्रारी ह्या ग्राहक आयोगाकडे न करता दिवाणी न्यायालयात करायला हव्या होत्या. सायबर क्राइम आणि बँकिंग लोकपाल ह्यांनी गंगोपाध्याय ह्यांची तक्रार फेटाळून लावली होती याकडेही लक्ष वेधले. दुसरे असे की RBI च्या परिपत्रकानुसार ग्राहकाच्या निष्काळजीपणामुळे गेलेले पैसे वसूल करण्याची जबाबदारी बँकेची नाही. ह्यावर गंगोपाध्याय ह्यांच्या वकिलाने असे प्रतिपादन केलं की ह्या घटनेनंतर बँकेने इंटरनेट बँकिंगच्या प्रणालीत सुधारणा केली. फोनवरून कुठलाही बदल न करता खातेदाराने बँकेत प्रत्यक्ष येणे बंधनकारक केलं. ह्यावरून हे सिद्ध होते की, बँकेच्या प्रणालीत त्रुटी होत्या. हे सगळे ऐकून घेतल्यावर राष्ट्रीय आयोगाने असे म्हट्ले की, प्रणालीतल्या त्रुटींमुळेच त्यांचा ड्रायव्हर केवळ मोबाईल नंबर आणि अकाउंट नंबर एव्हढ्याच माहितीच्या आधारे "VIEW ONLY' पर्याया वरून पैसे काढण्याच्या परवानगी वर बदल करू शकला. सर्व गोष्टींचा विचार करून राष्ट्रीय आयोगाने स्टेट बँकेचे अपील फेटाळून लावले आणि राज्य आयोगाचा निर्णय कायम ठेवून गंगोपाध्याय ह्यांना नुकसानभरपाई देण्याचा आदेश दिला.

वरील केसमध्ये खातेदाराला नुकसानभरपाई मिळाली असा निर्णय झाला असला तरीही ग्राहक म्हणून आपण बँकेचे व्यवहार शक्यतो स्वतःच करावे, वेळोवेळी पासबुक अपडेट करावे, इंटरनेट बँकिंग सेवा घेतली असेल, तर अनोळखी फोन घेऊ नये, कुठलीही अनोळखी लिंक उघडू नये, ती असुरक्षित, फसवी असू शकते. आपला PIN/ CVV/ PASSWORD/ जढझ कोणालाही सांगू नये. खूप जास्त व्याज किंवा फायदा देऊ असे दाखविणाऱ्या भूलपाडू जाहिरातींना बळी पडू नये. एकच संदेश लक्षात ठेवावा 'जागरूकता पाळा-पैसे सांभाळा'.

# बेरोजगारी घटली,आता रोजगार वाढ हवी

महाराष्ट्रात अर्थमंत्री अजित पवार यांनी जाहीर केलेल्या अर्थसंकल्पात मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना जाहीर करण्यात आली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना अगोदरच जाहीर करण्यात आली असून त्यासाठी ४६ हजार कोटी रुपयांचा खर्च केला जाणार आहे. या योजनेचे ठिकठिकाणी कार्यक्रमही घेतले जात आहेत. लाडक्या बहिणींप्रमाणे लाडक्या भावांसाठी आम्ही बरेच काही करत आहोत, असा दावा महाराष्ट्रातील एकनाथ शिंदे सरकारने केला आहे. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेसाठी ५५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. कौशल्य विकास विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्षामार्फत ही योजना राबवली जात आहे. उमेदवार हा १८ ते ३५ वयोगटातील असावा, अशी गट आहे. अशा उमेदवारांना सहा महिन्यांचा प्रशिक्षण कालावधी मिळेल. दर वर्षी कार्य प्रशिक्षणाच्या दहा लाख संधी मिळणार आहेत. बारावी उत्तीर्ण असलेल्यांसाठी सहा हजार रुपये महिना, आयटीआय आणि पदविका उत्तीर्ण असलेल्यांकरिता आठ हजार रुपये तसेच पदवीधर आणि पदव्युत्तर शिक्षण उत्तीर्ण असलेल्यांसाठी दहा हजार रुपये दिले जातील. या प्रकारे उद्योगांसाठी कुशल मनुष्यबळ तयार केले जाणार आहे. इच्छुक उमेदवार आणि आस्थापनांनी त्यासाठी सरकारकडे ऑनलाइन नोंदणी करणे अपेक्षित आहे. देशात आणि राज्यात बेरोजगारीचे प्रमाण प्रचंड असून त्यामुळे या प्रकारच्या योजनांची आवश्यकता असल्याचे कोणीही नाकारणार नाही.

चालू आर्थिक वर्षात भारताचा आर्थिक विकास दर ७.२ टक्के असेल अशी अपेक्षा आहे. आगामी काही वर्षांमध्ये अर्थव्यवस्थेची गती अशीच कायम राहील, अशी आशा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने व्यक्त केली आहे; परंतु भारतात असंख्य तरुण-तरुणींनी उत्तम शिक्षण घेतलेले असून देखील नोकरी मिळत नाही. मुख्य म्हणजे क्वालिटी जॉब्स किंवा काही एक गुणवत्ता आणि कौशल्य आवश्यक असणाऱ्या नोकऱ्या कमी आहेत. नुकताच पीरिऑडिक लेबर फोर्स सर्वे प्रसिद्ध झाला असून त्यामधून या प्रश्नावर प्रकाश पडला आहे. समग्र पातळीवर विचार केला असता लक्षात येते की २०१७-१८ मध्ये लेबर फोर्स पार्टिसिपेशन रेट म्हणजेच काम मिळण्याचे ४९ टक्के इतके प्रमाण २०२३-२४ पर्यंत ६० टक्क्यांवर आले आहे. ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे; परंतु एवढी वाढ होण्याचे कारण काय? तर शहरांमध्ये आणि मुख्य म्हणजे ग्रामीण भागात कामामधील महिलांच्या सहभागाचे प्रमाण



२४ टक्क्यांवरून ४७ टक्क्यांवर गेले आहे. स्त्रियांचा अर्थव्यवस्थेतील सहभाग वाढत असल्यास ही स्वागताचीच बाब आहे; परंतु थोडे खोलात गेल्यास लक्षात येईल की, लाखो कुटुंबांची अवस्था इतकी बिकट असते की, घरउत्पन्नात हातभार लावण्यासाठी या स्त्रियांना घरकाम करून, शिवाय छोटी-छोटी कामेही करावी लागत आहेत. अन्यथा, त्यांची गुजराण होणे अशक्य. यापैकी बहुतेक महिला स्वयंरोजगार क्षेत्रातच आहेत.

गेल्या सहा वर्षांमध्ये स्वयंरोजगार करून पोट भरणाऱ्या महिलांचे प्रमाण ५२ टक्क्यांवरून ६७ टक्क्यांवर गेले आहे. यापैकी काही महिला या स्टॉलवर बसून विक्री करतात किंवा हातगाड्यांवर भाजी वगैरे विकतात. अशाच प्रकारे अन्य लहान-सहान कामे करतात. काही महिला आपल्याच मुलाच्या अथवा नवऱ्याच्या दुकानात हातभार लावण्यासाठी बसतात किंवा स्वतःच्या छोट्या शेतात काम करतात. त्यासाठी त्यांना कोणताही पगार मिळत नाही. दुसरे म्हणजे, मोठ्या प्रमाणातील मजूर हे अनौपचारिक क्षेत्रात काम करणारे आहेत. २०२३-२४ मध्ये प्रोप्रायटरी किंवा पार्टनरशिपमधील छोट्या, छोट्या व्यवसाय-उद्योगात काम करणाऱ्या कामगारांची संख्या एकूण संख्येच्या ७३ टक्के इतकी होती. २०१७-१८ मध्ये हे प्रमाण ६८ टक्के इतके होते. शिवाय उत्पादन क्षेत्रातील रोजगार वाढलेला नाही. तो कुंठितावस्थेत आहे. उलट, कृषी क्षेत्रातील रोजगार हळूहळू वाढत आहे.

कृषी क्षेत्रातून मिळणारे उत्पन्न कमी आणि तरीही तिथेच अधिकाधिक प्रमाणात रोजगार वाढत असल्यास, ती चिंतेची बाब मानावी लागेल. कृषीक्षेत्रात सहा वर्षांपूर्वी ४४ टक्के लोक काम करत होते. आता हे प्रमाण ४६ टक्क्यांवर गेले आहे, तर कारखानदारी किंवा उत्पादन क्षेत्रातील २०२१-२२ मधील ११.६ टक्के रोजगार २०२३-२४ मध्ये ११.४ टक्क्यांवर आला आहे. देशातील बेरोजगारीचे प्रमाण २०१७-१८ मध्ये सहा टक्के होते. ते आता ३.२ टक्क्यांवर आले आहे, ही चांगली बाब आहे. तसेच युवकांमधील बेरोजगारीचे प्रमाण याच काळात १७ टक्क्यांवरून दहा टक्क्यांवर आले आहे. तरीदेखील दहा टक्के हे प्रमाणही जास्तच आहे. शिवाय उच्च शिक्षितांमधील बेरोजगारीचे प्रमाण खूप आहे. भारतात अधिकाधिक उत्पादक स्वरूपाच्या, गुणवत्तापूर्ण आणि चांगले वेतन देणाऱ्या रोजगारांच्या संधींची आवश्यकता आहे. भांडवलसघन, स्वयंचलित उत्पादनपद्धती आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा वाढता वापर यामुळे रोजगारनिर्मितीचे मोठे आव्हान देशासमोर आहे.

'सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी' (सीएमआयई) या स्वतंत्र 'थिंक टँक'च्या आकडेवारीनुसार जून २०२४ मध्ये भारतातील बेरोजगारीचा दर ९.२ टक्के होता, मे २०२४ मधील सात टक्क्यांवरून त्यात वाढ झाली आहे. 'सीएमआयई'चा कंझ्युमर पिरॅमिड्स हाऊसहोल्ड सर्व्हे दर्शवतो की जून २०२४ मध्ये महिला बेरोजगारी १८.५ टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे, जी राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त आहे. मागील वर्षी याच कालावधीतील १५.१ टक्क्यांपेक्षा ही वाढ जास्त आहे. त्याच वेळी, पुरुष बेरोजगारी ७.८ टक्के होती. जून २०२३ मधील ७.७ टक्क्यांपेक्षा ती किंचित जास्त आहे. कामगार सहभाग दर (एलपीआर) जून २०२४ मध्ये ४१.४ टक्क्यांपर्यंत वाढला. जून २०२३ मध्ये तो ३९.९ टक्के होता. ग्रामीण बेरोजगारीचा दर मे महिन्यातील ६.३ टक्क्यांवरून जूनमध्ये ९.३ टक्के झाला. शहरी बेरोजगारीचा दर ८.६ टक्क्यांवरून ८.९ टक्क्यांवर पोहोचला आहे. 'एलपीआर'हे काम करणाऱ्या किंवा काम करण्यास इच्छुक असलेल्या आणि एकूण काम करणाऱ्या वयोगटातील लोकसंख्येमध्ये लोकांपासून बनलेले असते. कामगारांची मागणी आणि रोजगार दरांमधील या बदलत्या कलांमुळे प्रचलित आर्थिक आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि ग्रामीण आणि शहरी भागात शाश्वत वाढ सुनिश्चित करण्यासाठी विचारशील धोरणात्मक उपायांची आवश्यकता आहे. हे प्रमाण रोजगाराच्या जास्त संधी निर्माण करण्यासाठी आणि देशाची आर्थिक लवचिकता वाढवण्यासाठी आर्थिक क्रियाकलापांमध्ये विविधता आणण्याचे महत्त्व अधोरेखित करते.

आजच्या जागतिक स्पर्धेत देशाचे अस्तित्व टिकवायचे असेल आणि अर्थव्यवस्थेचा पाया अधिक रुंद आणि खोल करायचा असेल, तर फक्त सरकारी भांडवलावर अवलंबून राहता येत नाही. म्हणून सरकारी उद्योगांचे खासगीकरण आणि खासगी क्षेत्राला प्रोत्साहन देणे अत्यंत गरजेचे होते आणि आजची ती गरज आहे. सार्वजनिक क्षेत्रात एखादा उद्योग करण्यासाठी शंभर माणसांना रोजगार दिला जात असेल आणि तेच काम खासगी क्षेत्राकडे देण्यात आल्यास फार कमी माणसांमध्ये केले जाते. कामाचा दर्जाही अधिक चांगला असतो आणि अधिक कामही केले जाते; पण यामुळे काही जणांचा रोजगार मात्र जातो हे सत्य आहे. यांत्रिकीकरण ही फक्त भांडवलशहांची नव्हे, तर काळाची गरज आहे. जागतिक स्पर्धेत टिकायचे असेल तर वस्तू आणि सेवांचा दर्जा फार महत्त्वाचा आहे. त्यामुळे आजच्या जगात यांत्रिकीकरणाला पर्याय नाही; परंतु एक स्वयंचलित यंत्र आणले जाते, तेव्हा अनेक माणसांचा रोजगार जातो. यंत्र चालवण्यासाठी आवश्यक ते शिक्षण आणि कौशल्य असलेल्यांना नोकरी मिळते; पण शिक्षण किंवा कौशल्य नसणाऱ्यांचा रोजगार जातो. त्यांच्यासाठी नव्याने रोजगार निर्माण होण्याचे प्रमाण कमी होते किंवा त्यांना अपेक्षित रोजगार मिळत नाही. आता तरुणांच्या हाताला काम नाही आणि उद्योगपती म्हणतात, त्यांना अपेक्षित मनुष्यबळ मिळत नाही. या दोन्ही गोष्टी एकाच वेळी खऱ्या असतील, तर त्याचा सोपा अर्थ आहे की तरुणांनी फक्त पदव्यांचे कागद मिळवले आहेत आणि खऱ्या अर्थाने रोजगाराभिमुख शिक्षण घेतलेले नाही. शिक्षण प्रक्रियेतील ही त्रुटी दूर करण्याचे आव्हान देशासमोर आहे.

# काय पाहिलंत माझ्यात?

निवडणूक झाली, निकाल लागला आणि चर्चा सुरू झाली. महाराष्ट्र विधानसभेच्या या निवडणुकीत महायुतीने विजय मिळवला. मात्र, हा विजय नेमका कशामुळे झाला, यावर आता सगळीकडे चर्चा रंगत आहे. महाराष्ट्रातील जनता, जी नेहमीच सुजाण मानली जाते, तिने महायुतीला का मत दिलं, हा प्रश्न विरोधकांइतकाच सत्ताधाऱ्यांनाही पडला आहे.

ही निवडणूक तीन प्रमुख मुद्द्यांवर लढवली गेली - धर्म, लाडकी बहीण, आणि विकास. हे तीन मुद्देच महायुतीच्या विजयाचे मुख्य कारण ठरले. मात्र, हे मुद्दे फक्त प्रचारासाठी होते की त्यातून खरंच जनतेला काही मिळणार आहे, हे येणारा काळच ठरवेल.

**धर्माची सावली**

धर्म हा नेहमीच एक संवेदनशील विषय असतो आणि यंदाच्या निवडणुकीतही त्याचा मोठ्या प्रमाणावर वापर झाला. राम मंदिर बांधणी, ३७० हटवणे, बटेंगे तो कटेंगे आणि स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा सन्मान या मुद्द्यांना मोठ्या प्रमाणावर प्रचारात जागा मिळाली.

महाराष्ट्रातील मतदार हे विचारशील आहेत, पण सावरकरांचं नाव जिथं येतं, तिथं त्यांची छाती अभिमानाने ताठ होते. राम मंदिराचा विषयही हिंदू मतदारांना जोडणारा ठरला.या मुद्द्यांमुळे मतदारांच्या भावना जागृत होत्या. त्यांच्या समस्यांवर उत्तर मिळालं नसलं तरी त्यांचं भान जागं ठेवलं गेलं.

**लाडकी बहीण आणि भावनिक राजकारण**

महायुतीच्या प्रचारात लाडकी बहीण योजना हा केंद्रबिंदू ठरला. महिलांना आर्थिक मदत देण्याची घोषणा करण्यात आली. निकष डावलून गरजू बरोबरच श्रीमंत घरातील महिलांनीही या योजनेचा लाभ घेतला, सरकारने योजनेचा प्रचार असा केला की जणू प्रत्येक घरात मदतीचा हात पोहोचणार आहे.

महिला मतदारांमध्ये आपण सरकारच्या लक्षात आहोत ही भावना निर्माण झाली, ज्याचा मतांवर चांगलाच परिणाम झाला. ही योजना जितकी आर्थिक लाभ देणारी होती, तितकीच ती भावनिक खेळीही होती.

**विकासाच्या नावाने सोंग**

विकास हा नेहमीच निवडणुकीत महत्त्वाचा मुद्दा असतो, पण यंदाच्या प्रचारात तो अगदीच मागे राहिला.

महाराष्ट्रातील बेरोजगारी हा मोठा प्रश्न आहे. मागील दशकभरात सरकारी नोकरभरती झाली नाही. सरकारने बेरोजगार तरुणांसाठी दहा महिने, दहा हजार योजना जाहीर केली, पण तिचा फारसा प्रभाव दिसला नाही.

केंद्र सरकारच्या मदतीने रस्ते आणि पायाभूत सुविधांची काही कामं सुरू आहेत, पण अनेक मोठे प्रकल्प गुजरातला गेले. यातून महाराष्ट्रातील जनतेच्या मनात नाराजी निर्माण झाली.

**लोकांनी का मत दिलं?**

मग अशा परिस्थितीत महायुतीला विजय कसा मिळाला? याचं उत्तर आहे - भावनांवर खेळलेला डाव. धर्म, सावरकर, आणि लाडकी बहीण यांच्या माध्यमातून मतदारांशी भावनिक संवाद साधण्यात सरकार यशस्वी ठरलं.दुसरीकडे, विरोधकांमध्ये स्पष्ट नेतृत्वाचा अभाव होता. त्यांच्याकडून ठोस धोरणं किंवा प्रभावी प्रचार न झाल्यामुळे जनता पर्यायाच्या अभावामुळे महायुतीकडे वळली.

**पुढे काय?**

महायुतीचा हा विजय हा शेवट नाही, तर सुरुवात आहे. लोकांनी महायुतीला सत्तेवर आणलं, पण हीच जनता त्यांच्या कामांचा हिशोब मागणार आहे.

तुम्ही खरंच आमच्यासाठी काही करणार आहात का? हा प्रश्न आता लोक विचारायला सुरुवात करतील.

महायुतीला आता धर्माच्या नावावर निवडून आल्याचा आनंद साजरा करण्यापेक्षा बेरोजगारी, विकास, आणि प्रकल्पांची योग्य अंमलबजावणी यावर लक्ष केंद्रित करावं लागेल.

**चुकीतून शिकण्याची संधी**

महायुतीने भावनिक मुद्द्यांवर विजय मिळवला असला, तरी त्यांच्या घोषणा आणि योजना अंमलबजावणीतील तफावत लवकरच उघड होईल. लाडकी बहीण योजना किती टक्के गरजू महिलांपर्यंत पोहोचली? बेरोजगारांना जाहीर केलेली मदत कोणत्या स्तरावर दिली गेली? हे सर्व प्रश्न लोक विचारतील.

लोकशाहीत निवडणूक जिंकणं सोपं आहे, पण विश्वास टिकवणं अवघड असतं.आज महायुतीकडे राज्याचा कारभार आहे. त्यांच्या प्रचारात दाखवलेलं स्वप्न आणि वास्तव यातला फरक कमी करण्यासाठी त्यांनी प्रयत्न करावेत, अन्यथा भावनिक मुद्द्यांवर मिळवलेलं मत व विश्वास टिकून राहणे अवघड आहे.

**-डॉ. भारत डी. कर्हाड**

**(लेखक: संवेदनशील राजकीय निरीक्षक)**

# अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटनेतेपदी निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटनेतेपदी निवड करण्यात आली आहे. आज देवगिरी बंगल्यावर झालेल्या बैठकीत सर्व आमदारांनी एकमुखाने हा निर्णय घेतल्याची माहिती आहे.दरम्यान मुख्यमंत्रीपदाबाबत अजून अशी काही चर्चा झाली नाही. अजितदादा मुख्यमंत्री व्हावे ही अपेक्षा आहे, पण भाजपचे नेते ठरवतील ते मान्य असेल. काल विजयाचा आनंद आम्ही सगळ्यांनी साजरा केला. सत्ता स्थापनेच्या घडामोडी ४८ तासात पूर्ण होईल, अभूतपूर्व यश राष्ट्रवादी पक्षाला मिळाले. राज्यात नवीन पर्व उदयास आला आहे, असे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी म्हटले आहे. महायुतीमध्ये भाजपचे १३२ तर शिवसेनेचे ५७ आमदार विजयी झाले आहेत. तर अजित पवारांच्या नेतृत्वात राष्ट्रवादीचे ४१ आमदार विजयी झाले आहेत. यानंतर आज त्यांच्या बंगल्यावर बैठक घेत अजित पवार यांच्यावर गटनेतेपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. दुसरीकडे शिवसेना शिंदेंच्या पक्षाचे आमदार मुंबईत यायला सुरूवात. मुंबईच्या वांद्रे येथील ताज अॅन्ड लॅड्समध्ये आतापर्यंत २९ आमदार उपस्थित असल्याची सूत्रांची माहिती आहे. हॉटेलमध्येच सर्व आमदारांच्या उपस्थितीत गटनेता निवडीची बैठक पार पडणार आहे. ग्रामीण भागातील आमदारांना पोहचायला वेळ लागत असल्याने शिंदे गटाची बैठक सायंकाळी घेण्यात येणार आहे.

अजित पवार यांनी सांगितले की, याची तर ओळख मी डायरेक्ट... आमच्यावेळी मोदींच्या सभेवेळी हा बाहेर थांबला. आमच्या इथे सगळे आमदार आत, शेवटी याला कोणी आतच घेईना.

## आष्टीसह मतदारसंघ बंद करण्याचा इशारा

# वाचाळ वीरांवर गुन्हा दाखल करून अटक करण्याची मागणी आ.धस समर्थक आक्रमक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी विधानसभा निवडणुकीत भाजपाच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांच्या समर्थकांनी अपक्ष उमेदवार भीमराव धोंडे यांचा प्रचार केल्यामुळे दुखावलेल्या आमदार सुरेश धस यांनी आमदार पंकजा मुंडे यांनी असे करावयास नको होते असे वक्तव्य विजयी सभेमध्ये केल्यानंतर आमदार पंकजा मुंडे समर्थकांनी आमदार सुरेश धस यांचे कुटुंबीयांवर अत्यंत खालच्या पातळीमध्ये टीका टिपणी केल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यामुळे आमदार सुरेश धस यांचे समर्थक आक्रमक झाले आणि त्यांनी या वाचाळवीरांवर कायदेशीर कारवाई करून त्यांना अटक करावी अन्यथा संपूर्ण मतदारसंघातील गावांमध्ये बंद करून निषेध व्यक्त करण्यात येईल असा इशारा आमदार सुरेश धस यांचे समर्थकांनी दिला आहे.

आष्टी पोलीस स्टेशन मध्ये दिलेल्या निवेदनामध्ये म्हटले आहे की,आ.सुरेश धस यांचा विक्रमी मताने



विजय झाल्यानंतर भा.ज.पा.च्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी विरोधी उमेदवाराला मदत करून पराभव करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप सुरेश धस यांनी केला सोशल मीडियावर पंकजा मुंडे यांच्या समर्थकांनी आमदार सुरेश धस यांच्यावर आणि त्यांच्या कुटुंबीयांवर खालच्या पातळीवर जाऊन टीका टिपणी करत असल्याचे व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर आष्टी पोलीस स्टेशन येथे समर्थकांनी घोषणाबाजी करत जाहीर निषेध व्यक्त करत आमच्या दैवताबाबत वक्तव्य करणाऱ्या व्यक्तींवर गुन्हे दाखल करून २४ तासाच्या आत अटक करावे अन्यथा तीव्र आंदोलन करत आष्टी शहरासह मतदार संघातील गावागावात बंद पाळण्याचा इशारा समर्थकांनी दिला असून आष्टी पोलीस स्टेशनचे निरीक्षक शरद भुतेकर यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे. दलित,आदीवासी,भटके विमुक्त,वंचीत,बहुजन समाजाचे नेते आ.सुरेश धस यांच्या कुटुंबीयावर राजकीय द्वेषापोटी अश्लिल भाषेत बोलुन तो व्हीडीओ व्हायरल करून आ.सुरेश धस यांची बदनामी केलेली आहे.भावना दुखवल्या आहेत. त्यामुळे अशा वक्तव्य करणाऱ्या सर्व संबंधीतांवर सायबर ॲक्टनुसार गुन्हे दाखल करून अटक करावी.भारतीय संविधानाने कलम १९ नुसार अभिव्यक्ती स्वतंत्र दिले आहे. त्यानुसार आमदार सुरेश धस यांनी विजयी सभेत संवैधानिक भाषेत आपले मत व्यक्त केलेले आहे. परंतु पंकजा मुंडे यांचे कार्यकर्ते समर्थक समाजा-समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचे कृत्य करत आहेत.महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांनी महिलांबद्दल बोलताना जी संस्कृती व परंपरा घालून दिलेली आहे त्याच महाराष्ट्रात महिलेबद्दल असे अश्लील भाषेत बोलणाऱ्या गावगुंडावर तात्काळ गुन्हे दाखल करन अटक करावी अन्यथा आष्टी तालुका बंदची हाक देत आहोत.तात्काळ कारवाई न झाल्यास होणाऱ्या परिणामाची जबाबदारी प्रशासनावर राहील याची नोंद घ्यावी असे निवेदनात नमूद केले आहे यावेळी पदाधिकारी,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



शिरूर हवेली विधानसभा मतदार संघाच्या नवनिर्वाचित आमदार पदी मा.ज्ञानेश्र्वर ऊर्फ माऊली आबा कटके यांची निवड झाल्याबद्दल दैनिक लोकनेता न्यूज नेटवर्क चे हवेली तालुका प्रतिनिधी संतोष कदम यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या .(छाया लोकनेता न्युज नेटवर्क हवेली)

## मी महाराष्ट्राच्या जनतेपुढे नतमस्तक

# हा महायुतीच्या एकजुटीचा विजय,आम्ही विरोधकांचा चक्रव्यूह यशस्वीपणे भेदून दाखवला-देवेंद्र फडणवीस

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

आजच्या विजयाने संपूर्ण महाराष्ट्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मागे असल्याचे स्पष्ट झाले. मतदारांनी मोदींचा एक है तो सेफ है चा नारा यशस्वी केला. हा महायुतीच्या एकजुटीचा विजय असून, आम्ही महाराष्ट्राच्या जनतेपुढे नतमस्तक आहोत, अशा शब्दांत भाजप नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुतीच्या दैदिप्यमान विजयावर प्रतिक्रिया दिली आहे.

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत भाजप प्रणित महायुतीचा मोठा विजय झाला आहे. आतापर्यंतच्या मतमोजणीत महायुतीने सर्वाधिक २२५ जागांवर आघाडी घेतली आहे. तर महाविकास आघाडी अवघ्या ५० जागांवर आघाडीवर आहे. देवेंद्र फडणवीस यांनी या विजयावर आनंद व्यक्त करताना हा महायुतीच्या एकजुटीचा विजय असल्याची भावना व्यक्त केली आहे.

देवेंद्र फडणवीस दुपारी पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले, आजच्या विजयामुळे संपूर्ण महाराष्ट्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मागे असल्याचे स्पष्ट झाले. मोदींनी दिलेला एक है तो सेफ है चा नारा मतदारांनी यशस्वी केला. सर्वांनी एकत्रित मतदान केले. आम्ही आमच्या लाडक्या बहिणींचे विशेष आभार मानतो. त्यांनी आम्हाला मोठा आशीर्वाद दिला.

विरोधकांनी राज्यात फेक नरेटिव्ह तयार केला होता. या नरेटिव्हचा यशस्वी सामना करणाऱ्या आमच्या राष्ट्रीय विचारांच्या विविध संघटनांचा हा विजय आहे. महाविकास आघाडीने महाराष्ट्रात मतांचे ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न केला, पण याविरोधात आमच्या विविध पंथांच्या संतांनी जनजागृती केली. हा त्यांचा विजय आहे. खेड्यापाड्यात गावोगावी जाऊन पक्षासाठी घाम गाळणाऱ्या आमच्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा हा विजय आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, रिपाइं नेते रामदास आठवले यांच्यासह सर्वच नेत्यांच्या एकजुटीचा हा विजय आहे. या विजयामध्ये सर्वांचा हातभार आहे. महाराष्ट्राच्या जनतेपुढे आम्ही नतमस्तक आहोत. याहून जास्त काही बोलताच येत नाही. हे प्रेम देणाऱ्या जनतेपुढे आम्ही अक्षरशः साष्टांग दंडवत घालतो. राज्यात झालेल्या विखारी प्रचाराला महाराष्ट्राच्या जनतेने आपल्या कृतीतून उत्तर दिले आहे. आम्ही आधूनिक अभिमन्यू आहोत. आम्ही विरोधकांचा चक्रव्यूह यशस्वीपणे भेदून दाखवला आहे. आज संपूर्ण महाराष्ट्र पंतप्रधान मोदींच्या पाठिशी असल्याचे सिद्ध झाले आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.कोणत्याही लोकशाहीमध्ये एक चांगला विरोधी पक्ष असणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे विरोधी पक्षांच्या निवडून येणाऱ्या आमदारांचा आम्ही सन्मान करू. त्यांचा आवाज छोटा असो की मोठा असो ते ज्या योग्य गोष्टी सांगतील, त्यांना आम्ही प्रतिसाद देऊ, असे फडणवीस म्हणाले.देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी विरोधकांनी ईव्हीएमवर व्यक्त केलेला संशयही फेटाळला. झारखंडमध्ये झामुमोचा विजय झाला. विरोधक तिथे लोकशाहीचा विजय झाल्याचा दावा करतात. पण महाराष्ट्रात पराभव झाल्यानंतर लोकशाही संकटात सापडली आहे, ईव्हीएमशी छेडछाड झाली आहे असे आरोप सुरू आहेत. विरोधकांनी आता आत्मचिंतन करावे. मी त्यांना सल्ला देणार नाही. मी फार छोटा व्यक्ती आहे. पण कधीतरी खरी कारणे काय आहेत याचा विचार करावा लागेल, असे ते म्हणाले.या निवडणुकीत काँग्रेसच्या बाळासाहेब थोरात, पृथ्वीराज चव्हाण यांच्यासारख्या बड्या नेत्यांचा पराभव झाला. देवेंद्र फडणवीस यांनी यावरही भाष्य केले. लोकशाहीची हीच खरी गमंत आहे. लोकशाहीमध्ये जनता कुणाला डोक्यावर घेईल व कुणाला पाडेल हे सांगता येत नाही. या निवडणुकीने हे पुन्हा एकदा दाखवून दिले आहे, असे ते म्हणाले.देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी मुख्यमंत्रपदाच्या उमेदवारावरही भाष्य केले. आमच्यात मुख्यमंत्रीपदावर कोणताही वाद होणार नाही. अमित शहा यांनी पत्रकार परिषदेत स्पष्टपणे सांगितले आहे. मुख्यमंत्रीपद हे कोणत्याही निकषावर नाही.

# एमआरआय सुविधा उपलब्ध करारूग्णालयातील इमारतींसाठी अग्निरोधक यंत्रणेसाठी ३३ कोटी ३१ लाख रूपयांच्या निधीची तरतूद करावी

## रूग्णालयाच्या अग्निरोधक यंत्रणेसाठीच्या निधीसाठी एमआरआय , कार्डियाक कॅथलॅब साठी लक्ष्यवेधी शेकोटी आंदोलन-डॉ.गणेश ढवळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

बीड जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयासह अधिनिस्थ इतर १७ अशा एकुण १८ आरोग्य संस्थांच्या इमारतीमध्ये अग्निरोधक यंत्रणेसाठीच्या ३३ कोटी ३१ लाख रुपयांचे प्रस्ताव ३ वर्षांपासून धुळखात पडुन असुन त्यासाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्यात यावा

तसेच जिल्हा रुग्णालयात एमआरआय,कार्डिअक कॅथलॅब सुविधा तातडीने उपलब्ध करावी तसेच माता- बालरुग्णालयाची ईमारत वापरात आणावी या विविध आरोग्य विषयक मागण्यांकडे जिल्हा व आरोग्य प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी

सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२५ सोमवार रोजी बीड जिल्ह्य रूग्णालय आवारात जिल्हा शल्यचिकित्सक बीड यांनी पाठवलेल्या प्रस्तावाची होळी करून निषेध व्यक्त करण्यासाठी लक्ष्यवेधी शेकोटी आंदोलन करण्यात आले. निवेदन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांना देण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस,सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार,मुबीन शेख , रामधन जमाले बीड जिल्हाध्यक्ष ( इंटक)आदी सहभागी होते.

आहे.

**रूग्णालयातील इमारतींसाठी अग्निरोधक यंत्रणेसाठी ३३ कोटी ३१ लाख रूपयांच्या निधीची तरतूद करावी**

बीड जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयासह अधिनस्थ ईतर १७ अशा एकुण १८ आरोग्य संस्थांच्या इमारतीमध्ये अग्निरोधक बसविण्यासाठी जिल्हा






रुग्णालय प्रशासनाने शासनाला मार्च २०२२ मध्ये ३३ कोटी ३१ लाख रुपयांचे अंदाजपत्रक पाठवत निधी आवश्यक असल्याने निधीची मागणी केली.या घटनेला ३ वर्षे उलटुनही निधी देण्याबाबत शासन स्तरावरून कुठल्याच हालचाली झाल्या नाहीत.तसेच जिल्हा नियोजन आयोगाकडून सुद्धा तरतूद करण्यात आली नाही.त्यामुळे शासन जानेवारी २०२१ मध्ये भंडारा जिल्ह्यातील आणि नोव्हेंबर २०२१मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील रुग्णालयातील आगीच्या घटनेसारखी वाट पहात आहे का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

**अग्निरोधक यंत्रणेसाठी संस्थानिहाय लागणारा खर्च (अंदाजे)**

१) स्वराती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय अंबेजोगाई १२ कोटी

२) जिल्हा रुग्णालय बीड ५ कोटी ३३ लाख

३) आष्टी ग्रामीण रुग्णालय १ कोटी ४३ लाख

४) उपजिल्हा रुग्णालय केज ३ कोटी १४ लाख

५) परळी उपजिल्हा रुग्णालय २ कोटी

६) स्त्री रूग्णालय नेकनुर ९५ लाख

७) ग्रामीण रुग्णालय पाटोदा ३७ लाख

८)ट्रामा केअर सेंटर तेलगाव १६ लाख

९) ग्रामीण रुग्णालय नांदुरघाट ९७ लाख

१०) ग्रामीण रुग्णालय धारूर १ कोटी ३९ लाख

११) ग्रामीण रुग्णालय तालखेड ९९ लाख ७० हजार

१२) माजलगाव ग्रामीण रुग्णालय १ कोटी

१३) ग्रामीण रुग्णालय रायमोह १३ लाख ३४ हजार

१४) ग्रामीण रुग्णालय चिंचवण १३ लाख ३४ हजार

१५) ग्रामीण रुग्णालय धानोरा १४ लाख

१६) वृद्धत्व आरोग्य व मानसोपचार केंद्र लोखंडी सावरगाव ४ कोटी ४४ लाख

१७) स्त्री रुग्णालय लोखंडी सावरगाव ७ लाख ३६ हजार

१८) परिचर्या महाविद्यालय लोखंडी सावरगाव ३२ लाख ३४ हजार

अशाप्रकारे एकुण ३३ कोटी ३१ लाख रूपयांच्या निधीची आवश्यकता असुन तातडीने त्याची तरतूद करण्यात यावी .

**एमआरआय सुविधा उपलब्ध करा**

बीड जिल्हा रुग्णालयाची स्थापना १९५० साली होऊनही रूग्णालयाला आता ७५ वर्षे होऊनही मेंदुतील ताप, शरीरातील धमन्या, अपघातात मेंदू व शरीरांतर्गत तपासणी करण्यासाठी आवश्यक एमआरआय सुविधा उपलब्ध नसुन रूग्णांना खाजगी दवाखान्यात जाऊन आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असुन रूग्णांना बाहेरून तपासणी करुन आणण्यात गोल्डन आवर वाया जात असल्याने वेळेवर उपचार होत नाहीत त्यामुळे रूग्ग दगावु शकतो त्यामुळे बीड जिल्हा रुग्णालयात एमआरआय सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी.

**कार्डियाक कॅथलॅब सुविधा उपलब्ध करण्यात यावी**

जिल्ह्याच्या ठिकाणी कार्डियाक कॅथलॅब मंजुरीच्या घोषणा अनेकवेळा करण्यात आल्या.३ वर्षांपूर्वी शासनाने निर्णय देखील घेतला मात्र जागा, उपकरणे व तज्ञ यामुळे अद्याप मुहूर्त लागलाच नाही.हृद्यविकाराच्या रूग्णांना वेळेत उपचार मिळणे आवश्यक असते.मात्र कार्डियाक कॅथलॅब नसल्याने रूग्णांना खाजगी रुग्णालयात लाखो रुपये मोजावे लागतात किंवा मृत्युला कवटाळावे लागते त्यामुळे कार्डियाक कॅथलॅब सुविधा तातडीने उपलब्ध करण्यात यावी.

# हजरत टिपू सुलतान रहमतुल्ला आलेह यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर संपन्न

## दीडशेवर रक्तदात्यांनी केले रक्तदान



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**माहूर । राजकिरण देशमुख**

माहूर शहरातील अल फलाह ग्रुप यांच्याकडून दरवर्षीप्रमाणे सलग पाचव्या वर्षी हजरत टिपू सुलताना रहमतुल्ला आलेह यांच्या जयंतीनिमित्त माहूर शहरातील अब्बू फंक्शन हॉल येथे महा रक्तदान शिबिराचे आयोजन दी २५ रोजी करण्यात आले होते या शिबिरात दीडशेवर रक्तदात्यांनी रक्तदान केले

महा रक्तदान शिबिराच्या शुभारंभ प्रसंगी जामा मस्जिद माहूरचे मौलवी खुर्शीद खान साहाब मौलवी उमर साहब मौलवी अब्दुल रहीम साहब मौलवी इरफान साहब मौलवी रिजवान रिजवी सहाब मौलवी तनवीर आलम साहाब मौलवी शहाजहान नुरी साहब मोहम्मद नसीर भाई मोहम्मद ताहेर भाई जमीर मलनस गफूर भाई सौदागर डॉ करीम बावाणी डॉ जुनेद बावाणी यांचे शहरातील मान्यवरांनी शिबिरास उपस्थिती दर्शवून मोठ्या प्रमाणात रक्तदान करून सर्वांनी रक्तदान करण्याचे आवाहन केलेशेर ए हिंद हजरत टिपू सुलतान रहमतुल्ला आलेह यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी रक्तदान शिबिर घेण्यात येते त्यामुळे यावर्षीही रक्तदान शिबिर कॅम्पला मुस्लिम समाजाच्या तरुणांनी भरपूर प्रतिसाद देत दीडशेवर बॉटल रक्तदान केले या रक्तदान शिबिराचे आयोजन शहरातील अल फलाह ग्रुप कडून करण्यात आले होते यावेळी ग्रुपचे सल्लागार अजीम सय्यद,जब्बार शेख,अध्यक्ष नजीर शेख,उपाध्यक्ष उमर फारूक,शोएब पठाण, इमरान शेख,जीशान शेख,साद खान, आमिर शेख,मजहर, निसार कुरेशी,रफिक सौदागर,सय्यद इरफान,शेख अफसर, शेख मुस्तकीम,अजहरुद्दीन यांचे सह तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते .यावेळी नांदेड येथील अक्सा फाउंडेशन या संस्थेमध्ये समाज कार्य करण्यासाठी माहूर शहरातून शोएब पठाण यांची अध्यक्षपदी निवड करून उपाध्यक्षपदी जीशान शेख सचिव पदी शाहरुख पठाण यांची निवड महाराष्ट्र प्रदेशचे अध्यक्ष मोईज भाई बागवान यांचे हस्ते करून पुढील समाजकार्यासाठी कार्यकारणी निवड करण्याचे पत्र त्यांना यावेळी देण्यात आले यावेळी द क्रिसेंट ब्लड सेंटर नांदेड चे मोहम्मद सोहेल मोईज बागवान भुवनेश्वर पांचाळ रवी देशमाने मोहम्मद हुसेन यांचे सह कर्मचाऱ्यांनी रक्तदान रक्तपेढीत जमा केले

# महायुतीच्या महाविजयामध्ये बंजारा समाजाचा मोठा वाटा–भगवान राठोड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

नुकत्याच महाराष्ट्रात झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रातील बंजारा समाजाने महायुती सरकारच्या बाजूने एकजुटीने मतदान केल्यामुळे महायुतीचा विजय निश्चीत झाला आहे, या निवडणुकीत महाराष्ट्रातील बंजारा समाजाने मोठ्या प्रमाणात महायुतीच्या बाजूने मतदान केल्याबद्दल, भाजपा नांदेड उपजिल्हा अध्यक्ष तथा तांडा समृद्धी योजनेचे जिल्हा स्तरीय अशासकीय सदस्य भगवान राठोड यांनी जाहीर आभार मानले आहे.



ग्राम विकास मंत्री गिरीश महाजन यांच्या विभागा मार्फत निर्माण केलेल्या संत सेवालाल महाराज तांडा समृद्धी योजनेच्या माध्यमातून तालुका स्तरा पर्यंत अशासकीय सदस्यांना कामाला लावण्याचे काम आरोग्यदूत रामेश्वर नाईक यांनी केले, तांडा समृद्धी योजनेच्या अशासकीय सदस्यांनी तांड्या तांड्यात केलेल्या कामाचा फायदा या महाविजयात झाला आहे. नांदेड जिल्ह्यातील सर्व तांड्यावर भारतीय जनता पार्टी आणि महायुतीच्या बाजूने बंजारा समाजाने मतदान केले आहे. महाराष्ट्रातील बंजारा संतांनी तांड्यातांड्यावर प्रवास करून समाजाला एकसंघ करण्याचा प्रयत्न केला आहे. पोहरादेवीचा विकास असेल किंवा राज्य शासनाने बंजारा समाजासाठी केलेल्या अनेक योजनेच्या घोषणा असतील यावर बंजारा समाजानी मोठ्या प्रमाणात मतदान केले आहे, येणाऱ्या काळात बंजारा समाजाचा विकास फक्त महायुतीचं सरकार आणि राज्याचे भावी मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब हेच करू शकतात हा विश्वास बंजारा समाजाने दाखवलेला नांदेड जिल्ह्यातील सर्वच्या सर्व जागेवर जिल्ह्यातील तमाम ७५० तांड्यावरील बंजारा समाजाने महायुतीच्या बाजूने मतदान केले आहे. त्यामुळे बंजारा समाजाला सरकारमध्ये उचित स्थान देऊन सन्मान करावा, अशी मागणी बंजारा समाजातून होत आहे.

नांदेड जिल्ह्यातून तिसऱ्यांदा भारतीय जनता पार्टीच्या तिकिटावर निवडून आलेले आमदार डॉ. तुषार राठोड यांना मंत्री करून बंजारा समाजाला उचित स्थान द्यावे, अशी मागणी बंजारा समाजातून होत आहे, या पुढे सरकार बंजारा समाजाच्या प्रश्नावर काम करून समाजाला न्याय देण्याचे कर्तव्य आता पुर्ण करावे, महायुतीच्या सरकारने बंजारा समाजाची काशी पोहरादेवीचा विकास समाजा साठी आणलेली तांडा समृद्धी योजना यासह बंजारा समाजासाठी विविध योजना राज्य शासनाने आणलेल्या आहेत, याचा फायदा महायुती सरकारला झालेला आहे.प्रत्येक तांड्यावरील बंजारा समाजाने एकतर्फी कौल देऊन महायुतीचा विजय सुखकर केलेला आहे, येणाऱ्या काळामध्ये महायुतीच्या सरकारने बंजारा तांड्याचा विकास केला पाहिजे ही आग्रही मागणी असणार आहे,सरकारने घोषित केलेल्या सर्व योजना बंजारा समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचल्या पाहिजेत यासाठी सरकारने प्रयत्न करावे, ज्या ज्या योजना सरकारने घोषित केलेल्या आहेत त्या योजनेचा लाभ बंजारा समाजाला व्हावा, यासाठी सर्व बंजारा समाज आग्रही राहणार आहे.

बंजारा समाजाच्या तांड्याचा विकास करावा,आज बंजारा समाज भारतीय जनता पार्टी व महायुतीच्या बाजूने राहिलेला आहे,भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाने व महायुतीच्या सर्व वरिष्ठ नेतृत्वाने बंजारा समाजाला सरकारमध्ये उचित स्थान देऊन बंजारा समाजाचा सन्मान करावा, ही आग्रहाची मागणी समाजाच्या वतीने राहणार आहे.

> **“ गावापासून कोसो दूर तांड्यावर असणाऱ्या समाजाला तांडा समृद्धी योजनेच्या माध्यमातून विकास करून, बंजारा समाजाला तांड्यावर रोजगार निर्मिती साठी उद्योग उभारावे, रोजगारासाठी भटकंती करणाऱ्या समाजाला स्थिरता द्यावी,अशी मागणी बंजारा समाजाची सरकारकडे राहणार आहे.आम्ही समाजाच्या वतीने आमचं काम केलं! सरकारने आता सरकारचं काम करावं! सरकार या समाजाला वाऱ्यावर सोडणार नाही, नक्कीच न्याय देईल असा विश्वास भाजपा जिल्हा उपाध्यक्ष भगवान राठोड यांनी व्यक्त केला आहे.**

# सांगवी पाटण येथे भैरवनाथ जन्माष्टमी सोहळा उत्साहात संपन्न



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे सालाबाद प्रमाणे २३ नोव्हेंबर ते २४ नोव्हेंबर या कालावधी मध्ये भव्य भैरवनाथ जन्माष्टमी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

सालाबाद प्रमाणे या सोहळ्यासाठी गावातील भाविक भक्त वेगवेगळ्या माध्यमातुन काशी, पैठण, नागतळा येथून कावडीचे जल आणत, मोठ्या श्रद्धेने पवित्र जलाने रात्री बाराला अभिषेक घालतात. मुख्य आकर्षक भैरवनाथ मंदिराला भव्य दिव्य,रोषनाई तसेच मंदिरात फुलांची सजावट, आकाशात फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली.

या सोहळ्याच्या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .शनिवार दि.२३/११/२०२४ रोजी संध्याकाळी ९ ते ११ यावेळेस ह.भ.प किर्तन केसरी राजेंद्र महाराज वाघमारे (गोंदीकर) जालना यांचे जाहिर हरिकिर्तन झाले तसेच २४/११/२०२४ सकाळी ९ ते ११ यावेळेस ह.भ.प भागवताचार्य काशिनाथ महाराज शास्त्री संस्थान सांगवी पाटण यांचे हरीकिर्तन झाले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने विविध क्षेत्रात काम करणाऱ्या भाविक भक्तांकडून व ग्रामस्थांकडून कार्यक्रमासाठी विविध सेवा, देणगी देण्यात आली. त्यानंतर महाप्रसादाने सोहळ्याची सांगता झाली.या सोहळ्याप्रसंगी राजकीय,शैक्षणिक, धार्मिक क्षेत्रातील मान्यवर तसेच पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**महायुतीच्या विजयाचे शिल्पकार मा. ना.देवेंद्रजी फडणवीस यांनी मुंबई येथे कंधार लोहा विधानसभा मतदारसंघाच्या नवनिर्वाचित आमदार पदी निवड झाल्याबद्दल आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा सत्कार करून भावी कार्यास शुभेच्छा दिल्या.यावेळी उपस्थित महायुतीच्या नेत्यांनी चिखलीकर साहेबांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.(छाया – लोकनेता न्युज नेटवर्क मुंबई)**



**मुंबई येथे देवगिरी निवासस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष उपमुख्यमंत्री मा.ना.श्री अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष मा.खा सुनील तटकरे आणि मा.श्री धनंजय मुंडे यांची भेट घेतली असता त्यांनी नवनिर्वाचित आमदार श्री प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा सत्कार करून अभिनंदन केले .याप्रसंगी जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, प्रदेश कार्यकारणी सदस्य वसंतराव सुगावे, भाजपा महिला मोर्चा उपाध्यक्ष सौ.प्रणिताताई देवरे चिखलीकर, माजी जि.प. सदस्य प्रवीण पाटील चिखलीकर, तालुकाध्यक्ष मनोहर भोसीकर, सचिन पाटील चिखलीकर, डॉ. प्रमोद पाटील चिखलीकर आदींसह नवनिर्वाचित आमदार व पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.(छाया – लोकनेता न्युज नेटवर्क मुंबई)**

# यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्र राज्याचे विकास पुरुष–प्राचार्य डॉ.ज.मो.भंडारी



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

कडा येथे गांधी महाविद्यालयातील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्रांमध्ये स्वतंत्र महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ ज मो भंडारी यांनी अध्यक्षस्थान भूषविले, तर प्रमुख पाहुणे श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे प्रशासकीय अधिकारी प्राध्यापक नवनाथ पडोळे, मोतीलाल कोठारी आणि पी एम जुनियर कॉलेज चे प्राचार्य श्री मथाजी शिखारे उपस्थित होते, प्राचार्य डॉ ज मो भंडारी यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या कार्यावर भाष्य केले ,त्यांनी असे सांगितले की यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री होते त्यांनी काही काळ भारताचे उपपंतप्रधान म्हणूनही कामकाज केले आहे तसेच काही काळ ते भारताचे संरक्षण मंत्री सुद्धा होते, त्यामुळेच ते महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात, त्यांनी महाराष्ट्र राज्याच्या विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य केलेले दिसून येते, कृषी,व्यापार , उद्योग, तसेच महाराष्ट्रातील विविध क्षेत्राचा विकास झाला तरच महाराष्ट्र राज्य प्रगती दर्शवणारे राज्य दिसून येईल असे त्यांचे मत होते, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्राचे केंद्र संयोजक प्रा डॉ अशोक कोरडे यांनी प्रस्ताविकात असे सांगितले की यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची स्थापना १ जुलै १९६९ रोजी महाराष्ट्र शासनाने केली या विद्यापीठाचे ध्येय लोक विद्यापीठ होण्याचे आहे, विद्यापीठाचा सातत्याने असा प्रयत्न आहे की समाजातील ज्यांच्या पर्यंत शिक्षण पोहोचले नाही त्यांच्यापर्यंत पोहोचून प्रमाणपत्र ते पदव्युत्तर शिक्षण गरजेनुसार मिळावे, विद्यापीठाचे मुख्यालय नाशिक येथे आहे, आठ विभागात विभागीय केंद्र आणि राज्यभर १७११ अभ्यास केंद्रे पसरलेले आहेत, गांधी महाविद्यालयात एकूण १९ शिक्षणक्रमांस मान्यता आहे, पदवी ते पदव्युत्तर पर्यंत शिक्षणाची सोय श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाच्या पदाधिकारी यांच्या सहकार्याने महाविद्यालयात सुरू आहे,महाराष्ट्र राज्यातील विविध भागातून शिक्षणापासून वंचित असणारे विद्यार्थी या ठिकाणी शिक्षण घेत आहेत, यशवंतराव चव्हाण पुण्यतिथी या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा डॉ सुनिल पंढरे यांनी केले तर आभार प्रा डॉ पांडुरंग अनारसे यांनी मांनले,यावेळी महाविद्यालयातील प्रा डॉ शिवराज पातळे, प्रा डॉ तुकाराम गोंदकर, प्रा डॉ चंद्रशेखर तळेकर, प्रा डॉ किशोर चौधरी, प्रा डॉ रमेश आबदार, प्रा डॉ नवनाथ विधाते, महाविद्यालयाचे अधीक्षक श्री विठ्ठल पालवे, प्रा डॉ नरेंद्र गवळी, प्रा डॉ संजय शिंदे, प्रा डॉ अरुणा कुलकर्णी, प्रा डॉ धनश्री मनोत, प्रा कोकणे, प्रा जाधव, प्रा तोरडमल, आणि महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रोफेसर डॉ अशोक कोरडे पा,केंद्रसंयोजक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्र गांधी महाविद्यालय कडा ,तालुका आष्टी, जिल्हा बीड,

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904